# 'के. के. वाघ'मध्ये राष्ट्रीय इनोव्हेशन परिषद

## ५जी, एआय, रोबोटिक्ससह अत्याधुनिक तंत्रज्ञान विषयांवर चर्चा

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ६ : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार (ई अँड टीसी) विभाग आणि 'स्पार्क क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'टेकएक्सप्लोर २०२६' ही राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी इनोव्हेशन परिषद नुकतीच उत्साहात पार पडली.

परिषदेस देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतून मोठ्या संख्येने संशोधनपत्रे प्राप्त झाली. त्यापैकी निवडक संशोधनपत्रांचे ऑनलाइन आणि ऑफलाइन सत्रांद्वारे सादरीकरण करण्यात आले. परिषदेत एकूण १०० संकल्पनात्मक सादरीकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी ७० पूर्ण संशोधनपत्रांचे सादरीकरण झाले, तर अंतिम टप्प्यासाठी ४६ संशोधनपत्रांची निवड करण्यात आली. यामध्ये १० ऑनलाइन आणि ३६ प्रत्यक्ष सादरीकरणांचा समावेश होता.

परिषदेअंतर्गत ५जी व ६ जी तंत्रज्ञान, प्रगत संप्रेषण प्रणाली, सेमीकंडक्टर आणि लो-पॉवर चिप डिझाईन, एम्बेडेड सिस्टिम्स व आयओटी, सिग्नल प्रोसेसिंग, मशीन लर्निंग, हार्डवेअर सिक्युरिटी, रोबोटिक्स व ऑटोमेशन तसेच बहुविषयक संशोधन विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प आणि संशोधन मांडले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या एअरक्राफ्ट अपग्रेड रिसर्च अँड डिझाईन सेंटरचे डेप्युटी जनरल मॅनेजर प्रशांत के. मोडक आणि चीफ मॅनेजर नृपेश कुमार उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डीन प्रा. एस. वाय. कुटे, विभागप्रमुख डॉ. सुनीता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आणि प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. अंशु गुप्ता यांनी केले. या परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधन, इनोव्हेशन आणि तांत्रिक सादरीकरणासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### विद्यार्थ्यांचा गौरव

■ परिषदेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांक भावेन पेड्डी (व्हीआयटी, पुणे) यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक हर्षवर्धन शाह (के. के. वाघ) तर तृतीय क्रमांक पृथा भाले (के. के. वाघ) यांनी मिळविला. प्रथम उपविजेते म्हणून शुभम चराटे (वालचंद) आणि रुत्विक कुलकर्णी (पीव्हीजी, नाशिक) यांची निवड झाली. द्वितीय उपविजेते म्हणून अवधूत जोशी (केबीटी, नाशिक-ऑफलाइन) आणि मयूरी चांबरे (के. के. वाघ, नाशिक) यांना सन्मानित करण्यात आले.

**Sakal News Paper , 07/05/2026**